दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २२४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.७ नोव्हेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

नवी मुंबई विमानतळाचे काम २०२१ पर्यंत पूर्ण करा ; मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिले निर्देश

दै.रायगड नगरी । मुंबई

महत्त्वाकांक्षी नवी मुंबईविमानतळाचे काम मे २०२१ पर्यंत पूर्ण करा अशी डेडलाईन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडच्या अधिकाऱ्यांची ठाकरे यांनी बैठक घेतली व त्यात हे निर्देश दिले.

आधीच्या देवेंद्र फडणवीस सरकारने या विमानतळाचे टेकऑफ डिसेंबर २०१९ मध्ये होईल असा दावा केला होता. मात्र, नंतर मे २०२० ची तर नंतर डिसेंबर २०२० ची डेडलाईन ठरविण्यात आली होती. अद्यापही हे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. त्यामुळे येत्या डिसेंबरपासून हे विमानतळ सुरू होऊ शकणार नाही. या पार्श्वभूमीवर आता कोणत्याही परिस्थितीत मे २०२१ पर्यंत विमानतळ सुरू व्हायला हवे असे मुख्यमंत्री ठाकरे यांनी सांगितले. हे विमानतळ सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रात गुंतवणूक येणार आहे. त्यामुळे आता कोणत्याही परिस्थितीत मे २०२१ पर्यंत काम पूर्ण व्हायला हवे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाविकास आघाडीकडून राज्यपालांकडे १२ नावांची यादी सुपूर्द

दै.रायगड नगरी । मुंबई

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यपाल नियुक्त १२ सदस्यांच्या नावाची यादी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना सादर केली आहे. या यादीतील काही नावं समोर आली आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब केल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ही यादी राज्यपालांकडे सुपूर्द केली. त्यामध्ये, काँग्रेसकडून रजनी पाटील आणि काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांचे नाव आहे. तसेच, मीरा भाईंदरचे मुझ्झफर हुसैन आणि अनिरुद्ध वणकर यांना संधी देण्यात आली आहे.

शिवसेनेकडून अभिनेत्री उर्मिला मांतोडकर यांच्या नावाची चर्चा होती, त्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. शिवसेनेनेही आपले चार उमेदवार ठरवले असून, ही नावं बंद लिफाफ्यातून राज्यपालांकडे सोपवण्यात आली आहेत. शिवसेनेकडून अभिनेत्री उर्मिला मांतोडकर, शिवव्याख्याते नितीन बानगुडे-पाटील, विजय करंजकर आणि चंद्रकांत रघुवंशी यांना शिवसेनेनं संधी दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून ४ नावं देण्यात आली एकनाथ खडसे, माजी खासदार राजू शेट्टी, गायक आनंद शिंदे आणि यशपाल भिंगे यांचं नाव देण्यात आलं आहे. त्यामुळे, राज्यपालांकडे तिन्ही पक्षाच्या प्रत्येकी ४ अशा एकूण १२ उमेदवारांच्या नावाची

यादी दिली आहे. मात्र, एकनाथ खडसेंच्या नावाला सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी विरोध केला होता. त्यासाठी, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेटही त्यांनी घेतली होती.

दरम्यान, परिवहन मंत्री अनिल परब यांनी ही यादी लवकरात लवकर मंजूर होईल असा विश्वास व्यक्त केला. राज्यपाल नियुक्त १२ नावांची यादी राज्यपालांना दिली. मुख्यमंत्र्यांचं पत्र आणि मंत्रिमंडळ ठराव यासह कायदेशीर बाबी नमूद करुन राज्यपालांना विनंती पत्र दिलं आहे सगळ्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन यादी सोपवली आहे, त्यामुळे राज्यपाल या यादीवर शिक्कामोर्तब करतील असा विश्वास असल्याचं परब म्हणाले

संक्षिप्त...

भडवळ येथे तरुणांची गळफास घेऊन आत्महत्या

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत -तालुक्यातील नेरळ-प्राध्यापक सुभाष नगर भडवळ येथील एका २४ वर्षीय तरुणाने आंब्याच्या झाडाला लटकावून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अक्षय चंद्रकांत कनोजे असे या आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.गावा शेजारी असणाऱ्या बतीचा पाणवठ्याजवळील झाडाला साडीच्या साह्याने लटकावून अक्षय ने आपले जीवन संपवले. मिळालेल्या माहिती नुसार अक्षय सकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास वडिलांना सांगून घरा बाहेर निघाला होता. साडे दहा वाजायला आले तरी अक्षय घरी आला नाही म्हणून वडील चंद्रकांत यांनी अक्षयचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास गावाला लागून असणाऱ्या बतीचा पाणवठ्याजवळील झाडाला अक्षय लटकतानाच्या स्थितीत आढळून आला. अक्षयने आत्महत्या करण्यासाठी वापरलेली साडी ही घरा-तूनच आणली होती. अक्षयने आत्महत्या केल्याने भडवळ गावात सर्वीकडे हळहळ व्यक्त होत आहे. अक्षयचे गेल्यावर्षी लग्न झाले होते, तर अक्षयची पत्नी ही गरोदर असून तीला आठवा महिना देखील सुरू असल्याचे समजते. लॉक डाऊन काळात हाताचे काम गेल्याने अक्षय आठ महिने घरीच होता, या नैराश्यातूनच अक्षयने आपले जीवन संपवले असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे. अक्षयवर पत्नी, आई-वडील, भाऊ यांची जबाबदारी होती त्यातच पत्नी गरोदर असल्याने अक्षय तणाव खाली आला होता. भडवळ गावातील ही दुसरी घटना आहे. या अगोदर देखील एका तरुणाने नैरायष्यातून झाडाला लटकावून आपले जीवन संपवले होते. आता या बाबत नेरळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून नेरळ पोलीस अधिक तपास घेत आहे.

मान्सूनमध्ये पडणाऱ्या विजांपासून संरक्षणासाठी कोकणवासियांच्या मदतीला येणार वीज प्रतिरोधक यंत्र

राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला प्रस्ताव ; पालकमंत्री आदिती तटकरे यांचा पाठपुरावा

दै.रायगड नगरी । अलिबाग

नैसर्गिकदृष्ट्या संपन्न असलेल्या रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या कोकणातील जिल्ह्यांना गेल्या काही वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागत आहे. निसर्ग चक्रीवादळ, अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मान्सून काळात पडणाऱ्या विजांमुळे होणारी मनुष्यहानी टाळण्यासाठी जिल्ह्यात वीज प्रतिरोधक यंत्रे बसविण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा प्रकारची आपत्ती उद्भवून मनुष्यहानी होवू नये, म्हणून पालकमंत्री आदिती तटकरे यांनी राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाशी झालेल्या बैठकीत जिल्ह्यात सध्या कार्यान्वित असलेली बसस्थ-ानके तसेच ग्रामपंचायत असे मिळून एकूण ८४२ ठिकाणी तसेच रस्त्याच्या

कडेला उभारण्यात येणाऱ्या नव्या ८२ निवारा शेडमध्ये वीज प्रतिरोधक यंत्रे बसविण्याचा निर्णय घेतला होता व संबंधितांना तसे आदेश दिले होते.

त्यानुसार आता याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु झाली असून पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी शासनास सविस्तर प्रस्ताव सादर केला व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून प्रकल्प व्यवस्थापक, राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली यांना अंतिम मंजूरीकरिता पाठविण्यात आला आहे. लवकरच रायगड जिल्ह्यासाठी बसस्थानके तसेच ग्रामपंचायत असे मिळून एकूण ८४२ ठिकाणी वीज प्रतिरोधक यंत्रे बसविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु होईल. या कामाकरिता एकूण ८ कोटी ३१ लक्ष रुपयांचा प्रस्ताव राज्य शासनाकडून ..../२

दिवाळी सुट्टीत वाढ, शिक्षक अन् विद्यार्थ्यांना आजपासून १४ दिवसांची सुट्टी

दै.रायगड नगरी । मुंबई

विद्यार्थी व शिक्षकांच्या भावनांचा आदर करून व त्यांच्या वाढीव दिवाळीच्या सुट्टीच्या मागणीचा विचार करून शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी उद्यापासून म्हणजेच ०७ नोव्हेंबर २०२० ते २० नोव्हेंबर २०२० पर्यत शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. ५ नोव्हेंबर २०२० मधील परीपत्रकानुसार १२ नोव्हेंबर २०२० ते १६ नोव्हेंबर २०२० अशी केवळ ५ दिवसांचीच दिवाळी सुट्टी यंदा देण्यात आली होती. मात्र, आता परिपत्रकात बदल करून १४ दिवसाची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्या या निर्णयाचे शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांकडून स्वागत करण्यात आले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्चपासून ऑनलाइन वर्ग सुरू आहेत. उन्हाळी व गणेशोत्सवाच्या सुट्टीतही ते सुरू होते. त्यामुळे दिवाळीमध्ये मोठी सुट्टी मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. मात्र, राज्य सरकारने १२ ते १६ नोव्हेंबर अशी फक्त पाच दिवसच ऑनलाईन वर्गाला सुट्टी जाहीर केली. शाळांना पूर्वी दिवाळीची सुट्टी २१ दिवस होती. त्यांनतर वार्षिक सुट्ट्या ८० ऐवजी ७६ करण्यात आल्याने दिवाळी सुट्टी १८ दिवस केली. पण, कोरोनामुळे अभ्यास उशिरा सुरू झाल्याने दिवाळी सुट्टीसंदर्भात काढलेल्या परिपत्रकात ही सुट्टी फक्त पाच दिवसांची केली. त्यामुळे दिव-ाळीची सुट्टी हळूहळू कमी करण्यात येत आहे, असा आरोप शिक्षक, विद्यार्थी, पालकांकडून करण्यात येत होता. या सुट्टीवरुन विद्यार्थी व शिक्षक संघटनांनी नाराजी व्यक्त करत दिवाळी सुट्टी वाढवून देण्याची मागणी केली होती.

शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांची भावना लक्षात घेऊन दिवाळीची सुट्टी १४ दिवसांपर्यंत वाढवली आहे. नवीन परिपत्रकानुसार उद्यापासूनच दिवाळीची सुट्टी शाळांना लागू होत आहे.

वडाळे तलावाच्या सुशोभिकरण विकास कामाची आ.प्रशांत ठाकूर यांनी केली पाहणी

पनवेल शहरातील वडाळे तलावाच्या सुशोभिकरण विकासकामाची आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दर्जेदार कामासंदर्भात आवश्यक सूचना केल्या. यावेळी उपमहापौर जगदिश गायकवाड, सभागृहनेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

मुजोर ग्रामसेवकाची बदली करा ; सरपंच ज्योती पायगुडे यांची मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार

दै.रायगड नगरी । संजय रिकामे

तळा : तळा तालुक्यातील गिरणे ग्रामपंचायतीतील सरपंच सौ.ज्योती कैलास पायगुडे यांनी ग्रामसेवक श्री.खंडु काळे यांच्या मनमानी आणि मुजोर कारभाराला कंटाळून काळे यांच्या विरोधात रायगड जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.किरण पाटील यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. या तक्रारी अर्जात त्यांनी गिरणे ग्रामस्थांच्या वतीने सुरवातीला ग्रामसेवक काळे यांच्या गैरवर्तुणिक बाबत तोंडी तक्रारी ग्रामस्थांकडुन येउ लागल्या त्यानंतर महीलांशी उद्धट बोलणे त्यांचा वारंवार अपमान करणे याबाबतीत लेखी तक्रारी येऊ लागल्या अनेक वेळा काळे यांना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा बदल झालेला दिसत नाही. सरपंचाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयात सरपंचाला काही कळत नाही असा वारंवार उल्लेख केला जातो शासकीय व सामाजिक योजना राबवताना ग्रामसेवकाकडुन सहकार्य मिळविण्या ऐवजी ग्रामसेवककाकडुन विरोधाची भुमिका घेतली जाते त्यामुळे अशा मुजोर ग्रामसेवकामुळे ग्रामपंचायतीचा विकास खुंटला असुन या ग्रामसेवकाची त्वरित बदली करुन नवीन ग्रामसेवकाची नियुक्ती करावी असे पत्रात नमुद केले आहे.

ग्रामसेवकाला ग्रामपंचायतीचा सचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी वा चिटणीस या नावाने ओळखतात. ग्रामसेवकाची निवड जिल्हा परिषदेकडून होते, व त्याची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी करतात. हा जिल्हा परिषदेचा सेवक असतो. त्याचे वेतन जिल्हा निधीतून होते.त्याच्यावर गटविकास अधिकारी यांचे नजीकचे नियंत्रण असते. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करणे, ग्रामपंचायतीचे दफ्तर सांभाळणे, गावातील लोकांना आरोग्य, शेती, ग्रामविकास, शिक्षण इत्यादींबाबत सल्ला देणे, लोकांना ग्रामविकासाच्या वेगवेगळ्या शासकीय योजनांची माहिती देणे, करवसुल करणे, जनतेला विविध प्रकारची दाखले देणें, जन्म-मृत्यू,उपजतमृत्यू नोंदणी निबंधक अधिकारी म्हनून काम पाहणे, बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून कामकाज करणे, मजूर नोंदणी अधिकारी म्हणून कामकाज करणे, बांधकाम कामगार यांची नोंदणी करणे, जनमाहिती अधिकारी कामकाज करणे, .../२

जेएनपीटी सेझ प्रकल्पासाठी जेएनपीटीची ५० मेगावॉट वीजनिर्मितीच्या सबस्टेशनची उभारणी

५० कोटींच्या खर्चाच्या प्रकल्पामुळे सेझ व्यावसायिकांना कमी दराने वीजपुरवठा होणार

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : जेएनपीटीत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उभारण्यात येत असलेल्या सेझ प्रकल्पाला वीजपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र ५० मेगावॉट वीज निर्मितीचे सबस्टेशन उभारण्यात येत आहे. येत्या डिसेंबर अखेरपर्यंत हे सबस्टेशन कार्यान्वित होणार आहे. सुमारे ५० कोटी खर्चून उभारण्यात येत असलेल्या सबस्टेशनमुळे सेझमधील व्यावसायिकांना अगदी कमी दरात वीज पुरवठा करणे शक्य होणार असल्याची माहिती जेएनपीटी अधिकाऱ्यांनी दिली आहे.

जेएनपीटीने २७७ हेक्टर क्षेत्रात अत्याधुनिक सेझ प्रकल्प निर्मितीचे काम सुरू केले आहे. केंद्र सरकारच्या नौकानयन मंत्रालयाच्या सागरमाला योजनेतून सुमारे ५ हजार कोटी खर्चून उभारण्यात येत असलेल्या जेएनपीटी सेझ प्रकल्पाच्या पायाभरणीचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २०१४ मध्ये झाले आहे.नव्याने सुरू होण्याच्या मार्गावर असलेले नवी मुंबई एअरपोर्ट, डीएफसी रेल कॉरेडॉर, ट्रान्स हार्बर लिंकशी हा अत्याधुनिक सेझ प्रकल्प जोडला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या या जेएनपीटी सेझमध्ये देशी- विदेशी कंपन्यांकडून हजारो कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. तसेच या जेएनपीटी सेझमध्ये सुमारे सव्वा लाख रोजगारही उपलब्ध होणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.

या जेएनपीटी सेझ प्रकल्पाला वीज पुरवठा करण्यासाठी जेएनपीटी मार्फतच ५० मेगावॉट वीजनिर्मिती क्षमतेचे सबस्टेशन उभारण्यात येत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ..../२

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया नव्याने राबवा : शेकापची मागणी

सरचिटणीस आ.जयंत पाटील यांचे निवडणूक आयोगाला पत्र

दै.रायगड नगरी । अलिबाग

कोरोना रोगाच्या प्रादुर्भावामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्या स्थितीत स्थगिती दिलेल्या आदेशाला झालेला दिर्घ काळ लक्षात घेऊन व नव्याने उमेदवारीस इच्छुकांची संधी हिरावली जावू नये यासाठी सदर निवडणूक प्रक्रिया नव्याने व जलद गतीने राबविण्यात यावी अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार भाई जयंत पाटील यांनी राज्याच्या निवडणूक आयोगाकडे केली आहे.

भाई जयंत पाटील यांनी निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की,महानगर पालिका, नवी मुंबई, औरंगाबाद व वसई विरार , ९ नगर परिषद - नगर पंचायती व पोटनिवडणुका, जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्या (भंडारा व गोंदिया) आणि १५७० ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम व सुमारे १२०१५ ग्रामपंचायतीचा प्रभाग रचना कार्यक्रम सुरू होता. मात्र कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील महानगर पालिका, नगर परिषदा - नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रास्तावित असणाऱ्या निवडणूका १७ मार्च रोजीच्या आदेशानुसार आहे त्या टप्प्यावर स्थगित करुन ३ महिण्यांसाठी पुढे ढकलण्यात आल्या होत्या व पुढिल ३ महिने कोणत्याही निवडणूका न घेण्याच्या ..../२

सत्य आणि सोयीस्कर सत्य

अर्णव गोस्वामी यांना बुधवारी झालेली अटक, अटकेच्या वेळी घडलेले बहारदार नाट्य, त्या नाट्यानंतर समाजमाध्यमांवर व्यक्त झालेली मते आणि राजकीय नेत्यांच्या टोकाच्या प्रतिक्रिया, यांतून बदलत्या काळाचा पोत आपल्याला कळतो. बुधवारी आणि गुरुवारी अर्णव गोस्वामी यांच्या संदर्भात घडलेल्या घटना, अनेक प्रकारांनी काळजी वाटाव्या अशा आहेत. यातून माध्यमांचे अपरिपक्व रूप जसे समोर आले; तसेच राजकीय पक्षांचा आणि सरकारचाही बालिशपणा दिसून आला. कोणत्याही प्रकारच्या सत्तेचा गैरवापर, अखेर याच वाटेने जात असतो. सरकारवर माध्यमांनी अंकुश ठेवणे अपेक्षित असते, त्या अर्थाने प्रसारमाध्यमांची जबाबदारीही मोठी आहे; मात्र त्याआधी त्यांनीही स्वतःचे पावित्र्य राखण्याची गरज असते. आपल्याला सर्व माफ आहे अशी भावना कोणाचीही असू नये. 'कायदा सर्वतोपरी आहे आणि कायद्यानुसार जे काही घडेल, ते आपण स्वीकारले पाहिजे,' या उच्चारांची जपमाळ आजही सतत ओढली जात असते; परंतु आपल्याला जी बाजू योग्य वाटते, तीच कायद्यालाही योग्य वाटली पाहिजे आणि तीच सर्वांनी स्वीकारली पाहिजे, असा हट्ट किंवा हेका धरणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढत आहे. पत्रकारिता, राजकारण आणि समाजमन या तिन्ही स्तरांवर याच भावनेची घट्ट पकड आज दिसून येते. वास्तवाच्या भिंगातून घटनांकडे पाहण्याचे आपण पूर्णपणे विसरून गेलो आहोत आणि प्रत्येक घटनेकडे राजकीय मतप्रदर्शनाची संधी म्हणूनच पाहण्याची खोड आपल्याला लागलेली आहे. ही परिस्थिती येण्यास राजकीय पक्ष आणि नेते, प्रसार माध्यमे; तसेच समाजमाध्यमे, हे सर्व घटक सारखेच कारणीभूत आहेत. सुशांतसिंह राजपूत प्रकरणी, सत्याचा शोध दुय्यम ठरला आणि हे प्रकरण हाताशी धरून राजकीय विरोधकांना कात्रजचा घाट दाखवण्याचे प्रयत्न सुरू झाले, तर अर्णव गोस्वामींच्या अटकेबाबतही तेच म्हणावे अशी स्थिती आहे. तसे पाहिले, तर एखादी वाहिनी आणि महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याचे शासन यांच्या ताकदीची तुलनाच होऊ शकत नाही. कोणाला किती महत्त्व द्यायचे, हे ठरवण्याइतपत भान सरकारला असायला हवे. अभिनेत्री कंगनावरील कारवाईबाबत आणि अर्णव प्रकरणीदेखील शासनाचे; तसेच अर्णव यांना पाठीशी घालणारांचे हे भान सुटले; त्यामुळेच ज्या घटनेच्या संदर्भात ही अटक झाली, ती पूर्णपणे बाजूलाच राहिली. ज्या सरकारच्या कार्यकाळात गोस्वामींच्या चौकशीची फाइल बंद केली गेली, त्यांचे पाठीराखे आणि ज्या सरकारच्या कार्यकाळात गोस्वामी यांना अटक झाली, त्यांचे समर्थक या दोन गटांतच हमरीतुमरी सुरू झाली आहे. 'न्याय-अन्यायाला जात, धर्म, प्रांत नसतो' हा आदर्शवाद आज बाळबोध ठरतो आहे आणि बिहारी अथवा मराठी भाषिक म्हणून न्याय मागितला जातो आहे. राजकीय सत्तेचा वापर कसा व कशासाठी करावयाचा असतो, याचे नवे धडे आपण सध्या राज्यात आणि देशभरही गिरवत असून, एका अलिखित नव्या घटनेचा स्वीकार सर्वांनीच केला आहे की काय, असे वाटू लागले आहे. हाथरसमध्ये राजकीय-प्रशासकीय अतिरेकापाठोपाठ, माध्यमांच्या अविचारी धाडसी पत्रकारितेचाही अतिरेक आपण पाहिला. एखाद्या गुंडाचे एन्काउंटर होते, तेव्हा 'यांना याच मार्गाने धडा शिकवला पाहिजे' म्हणत टाळ्या वाजवताना, ही पद्धत रूढ झाली, तर ती प्रत्येक वेळी गुंडाचाच खात्मा करण्यासाठी वापरली जाईल याची शाश्वती नसते, याचा आपल्याला सहज विसर पडतो. लोकशाहीच्या चौथ्या खांबाला खांद्याचा टेकू कधी द्यायचा आणि त्यावर लत्ताप्रहार कधी करायचा, याची गणिते राजकीय लाभाच्या गुणाकार-भागाकारावर ठरतात. लोकशाहीच्या एखाद्या खांबावर प्रहार झाला, तर त्यातून जनता जनार्दनाचा नरसिंहावतार प्रकट होईल आणि लोकशाहीच्या शत्रूचा नाश करील, अशी स्थितीही आता राहिलेली नाही; कारण समाजमाध्यमांनी या जनता जनार्दनाच्या आत लपून बसलेले भेदाभेदांचे अमंगळ प्रवाह मुक्तपणे वाहते केले आहेत. 'एक लाकूड हातांनी वाकवले, तर त्याचे दोन तुकडे होतात, सात लाकडांची मोळी बांधली, तर ती तुटता तुटत नाही,' ही एकीची बाळबोध व्याख्या विस्मरणात गेल्यावर, 'मी तुटेन; पण तुझ्यासोबत येणार नाही,' हेच भागधेय उरते, हे आपण लक्षात घेत नाही. या स्थितीत कोणाचीही बाजू घेण्यापेक्षा सत्याची बाजू घेणे आणि कायद्याला त्याचे काम प्रामाणिकपणे करू देणे, हे अधिक महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अन्वय नाईक आणि त्यांच्या मातोश्री यांनी आत्महत्या केली हे सत्य आहे, त्यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत अर्णव यांच्यासह तिघांची नावे आणि आर्थिक कारणे लिहिली होती, हेही वास्तव आहे. आधीच्या सरकारने या प्रकरणाची फाइल बंद केली होती, तेव्हापासूनच नाईक यांच्या पत्नी आणि कन्या हा तपास पुन्हा सुरू व्हावा अशी मागणी करत होत्या. आता ती केस पुन्हा सुरू झाल्यावर आणि अर्णव यांना अटक झाल्यावर, ती राजकीय असल्याचा आक्षेप घेणारे, तपास बंद करण्याचा निर्णय अराजकीय होता, असे छातीठोकपणे सांगू शकतील का? सत्य ही जशी नेहमीच आपली ताकद बनते, तशी सोयीस्कर सत्य ही आपली अडचण बनते, याचा विचार दोन्ही बाजूंनी होणे आवश्यक ठरते. राज्य शासनाचा गाडा हाकताना, सूडभावनेने कारवाई करणे समर्थनीय नाहीच आणि ते केंद्रापासून राज्यापर्यंत सर्वांनाच लागू होते. टीका सहन करण्याची तयारी, टीकेला योग्य भाषेत उत्तर देण्याची तयारी आणि कोणी कितीही उचकवले, तरी आपण पक्ष संघटना चालवत नसून सरकार चालवत आहोत, याचे भान ठेवण्याच्या वृत्तीचा अभाव, यातूनच आजचे बरेचसे संघर्ष जन्माला आले आहेत. यालाच बहुधा 'न्यू नॉर्मल' म्हणत असावेत!

मुरुड अंजुमन महाविद्यालयाच्या कु. सफा दरोगे व कु. यया ती अहिरे यांचे नेत्रदिपक यश

दै.रायगड नगरी । आगरदांडा

मुंबई विद्यापीठाच्या शाखा शास्त्रेच्या सहाव्या सत्राच्या परीक्षेमध्ये मुरुड च्या अंजुमन महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला. यामध्ये कु. सफा दरोगे व कु. यया ती अहिरे यां दोघांनी९८% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. मुरुड अंजुमन महाविद्यालयाच्या गत दहा वर्षाच्या इतिहासात विद्यापीठाच्या परीक्षेत ९८%मार्क्स मिळवून कु. सफा दरोगे व कु. यया ती अहिरे यां दोघांनी नवा इतिहास रचला आहे. महाविद्यालयाच्या इतिहासामध्ये या दोघांनी आपने ना-वसुवर्ण अक्षरामध्ये कोरले आहे.

कु. सफा दरोगे हि मुरुड नगर परिषेदच्या उपनगरांध्येक्षा श्रीमती. नौशीन दरोगे यांची कन्या आहे. कु. यया ती अहिरेहे मुरुड शहरातील वाहतूक पोलीस श्री. अनिल अहिरे यांची कन्या आहे. कु. सफा दरोगे व कु. यया ती अहिरे या दोघींवर सर्व सामाजिक स्तरांवरून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अंजुमन इस्लाम जंजिरा चे अध्यक्ष मा. श्री. इरफान शाह व महाविद्यालयाचे चेअरमन झैनुद्दिन कादरी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद फुलारी यांच्या हस्तेकु, सफा व कु.यया ती या सुवर्ण कन्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार सभारंभासअंजुमन इस्लाम जंजिराचे सचिव हिफझूर रहमान नजीर व सहसचिव अब्दुल रहीम कबले, खजिंदर मा. श्री. अल्ताफ मलिक हे मान्यवर आवर्जून उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक व प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कु. सफा दरोगे व तिची आई म्हणजेच उपनगराध्यक्ष मा. श्रीमती.नौशीन दरोगे मॅडम यांनी सत्कार स्वीकारला. या प्रसंगी कु. सफा दरोगे हिचे यशाचे श्रये सर्व शक्तिमान अल्लाह, पालक व महाविद्यालयास दिले. उपनगराध्यक्षा श्रीमती. नौशीन दरोगे मॅडम यांनी आई म्हणून या प्रसंगी गतिवर्णात आले.महाविद्यालयाच्या मॅनेजमेंट व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व प्राचार्यांचे आभार मानले.

कु. यया ती अहिरे व अनिल अहिरे वाहतूक पोलीस यांनी सत्कार स्वीकारताना अंजुमनच्या सहकार्याच्या उल्लेख केला. मुलींच्या शिक्षणासाठी नौकरी दरम्यान अफाट मेहनतीच्या उल्लेख डबडबलेल्या नेत्रांनी श्री. अनिल अहिरे यांनी केल. या वेळेस कर्तव्यनिष्ठ पोलीस पिता मुलींच्या कर्तृत्वाने भारा-वलेला बाप सर्वांना भावला. मुलीला स्पर्धा परीक्षेच्या तयारी साठी नाशिक येथे नेऊन तहसीलदार-जिल्हाधिकारी बनविण्याचे स्वप्न अनिल अहिरे यांनी बोलून दाखिवले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद फुलारी यांनी या विद्यार्थ्यीनींना महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्यात इतिहास रचून तेंडुलकर सारखे रेकॉर्ड केले आहे. यांचा अभिमान आहे असे सांगितले. तेंडुलकरांच्या रेकॉर्ड मोडू नये असे वाटत असतानाच विराट कोहली ने नवे रेकॉर्ड केले. याप्रमाणे ९८% मार्कांचा कु. सफा व कु. यया ती यांच्या रेकॉर्ड पुढे कधी व कोणत्या विराट कोहली कडून मोडला जाईल असा उल्लेख मा. श्री.अब्दुल रहीम कबले केला.

मा. अध्यक्ष इरफान शाह यांनी उपस्थित सर्वांचे कौतुक करून शुभाशीर्वाद दिले. अंजुमन महाविद्यालयाकडून उत्त-ारोउत्तर अशीच शैक्षणिक प्रगती होईल शैक्षणिक सत्रामध्ये विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडत राहावे या भावनेने कार्यक्रम संपन्न झाला .

धोकादायक, घातक आणि विषारी फटाक्यांवर बंदी घाला

दै.रायगड नगरी । मुंबई

आवाज फाऊंडेशनने प्रयोगशाळेत फटाक्यांची चाचणी केली असून, यामध्ये पर्यावरण आणि मानवी आरोग्यास हानीकारक घटक आढळले आहेत. परिणामी अशा धोकादायक, घातक आणि विषारी रसायनांचा समावेश असलेलया फटाक्यांवर बंदी घालण्यात यावी, असा सूर लागवण्यात आला आहे. यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पाऊले उचलावीत, असे म्हणणे आवाज फाऊंडेशनने मांडले आहे.

फटाक्यांमध्ये मानवी आरोग्यासाठी अत्यंत विषारी घटक आहेत. ज्यात सल्फर ट्रायऑक्साइड, व्हॅनिडियम पेंटॉक्साइड, पोटॅशियम ऑक्साईड्स आणि कॉपर ऑक्साईड्स आहे. हे सर्व विषारी आहे. ही हानिकारक रसायने हवेत सोडली जातात. त्यामुळे वायू प्रदूषणात भर पडते. या व्यतिरिक्त ध्वनी प्रदूषण देखील होत असून, यावर उपाय म्हणजे पर्यावरण पूरक दिवाळी साजरे करण्यात यावे, असे म्हणणे मांडले जात आहे. आता फटाक्यांमधील धोकादायक रसायनांच्या चाचणी परिणामामुळे मानवी आरोग्यास होणार्या गंभीर धोक्याबद्दल विचार करा. ज्यायोगे वायुप्रदूषण प्रश्न सोडता येऊ शकेल, असे आवाज फाऊंडेशनने म्हटले आहे. हवा आणि ध्वनी प्रदूषणात भर पडण्याची शक्यता असून, फटाके वापरणे अधिक धोकादायक आहे. परिणामी सरकारला विनंती आहे की तातडीने सर्व फटाक्यांच्या वापरावर बंदी घाला, अशी मागणी सरतेशेवटी केली आहे, अशी माहिती आवाज फाऊंडेशनच्या सुमैरा अब्दुलाली यांनी दिली.

दुसरीकडे दिवाळीत फटाके फोडू नका. कारण फडाके फोडले आणि त्याचा धूर मोठया प्रमाणावर वातावरणात मिसळला तर त्याचा त्रास कोरोना रुग्णांनासह नागरिकांना विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना मोठया प्रमाणावर होऊ शकतो. त्यामुळे यावर्षी कोरोनाला हरविण्यासाठी दिवाळी पर्यावरणपूरक साजरी करा, असे आवाहन पर्यावरण क्षेत्रात काम करत असलेल्या मिली शेटटी यांनी केले आहे. दरम्यान, दिवाळी साजरी करताना गर्दी टाळा, खबरदारी घेऊन महाराष्ट्रात फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी यावेळी नागरिकांना केले आहे.

नागोठण्यातील शांतीनगर भागात सापडला दहा फुटी अजगर

दै.रायगड नगरी । वाकण

नागोठण्यातील शांतीनगर भागातील न्यु सूर्यदर्शन को.ऑ. हाऊसिंग सोसायटी लगतच असलेल्या पाटबंधारे खात्याच्या पडीक इमारतीत दबा धरून बसलेल्या एका १० फुटी महाकाय अजगराला पकडून त्याची रवानगी सुकेळीच्या जंगलात करण्याची महत्वपूर्ण कामगिरी शांतीनगर भागातच राहणारे परंतु मूळचे नागोठण्याजवळील कुहिरे (ता.पेण) येथील रहिवासी असलेले रघुनाथ शिंदे यांनी आज केली. त्यामुळे भयभीत झालेल्या न्यू सूर्यदर्शन हाऊसिंग सोसायटीच्या परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

न्यु सूर्यदर्शन को.ऑ. हाऊसिंग सोसायटी मध्ये राहणारे रमेश केदारी हे त्यांनी नुकतीच घेतलेली व पाटबंधारे खात्याच्या या पडिक इमारती लगतच उभी केलेली स्कॉर्पिओ गाडी पाहुण्यांना दाखविण्यासाठी आज दुपारी ३.३० वाजण्याच्या गेले असता त्यांना पडिक इमारतीच्या खोलीतून कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आला. त्यामुळे त्यांनी त्या खोलीत जाऊन पाहणी केली असता खोलीतील वरील भागात असलेल्या सज्जावर हा महाकाय अजगर वेटोळे करुन बसलेला त्यांना दिसून आला. रमेश यांनी त्वरित शांतीनगर भागातील व न्यु सूर्यदर्शन को.ऑ. हाऊसिंग सोसायटी पासून जवळच अदलेल्या जनसुशा हाऊसिंग सोसायटीत राहणारे सर्प मित्र रघुनाथ शिंदे यांना बोलविले. अनेक विषारी साप पकडण्याचा अनुभव पाठीशी असलेल्या रघुनाथ शिंदे यांनीही या पडीक इमारतीत जाऊन तेथे

असलेल्या अजगराला शिताफीने पकडले. तोपर्यंत या अजगराला बघण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी न्यु सूर्यदर्शन को.ऑ. हाऊसिंग सोसायटी जवळ झाली होती. रघुनाथ शिंदे यांनी अजगराला पकडताच याठिकाणी जमलेल्या काही हौशी तरूणांनी मिळून या अजगराला उचलले. यावेळी त्या अजगरासोबत फोटोसेशन करण्याचा मोहही या तरूणांना आवरता आला नाही. हा अजगर एवढा मोठा होता की, तो मनुष्यालाही सहजपणे गिळून पचवू शकत होता असे सर्प मित्र रघुनाथ शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान मानवी वसाहती लगतच हा अजगर आढळून आल्याने नागरिकांत भीतीचे वाता-वरण निर्माण झाले आहे. अजगराला पकडून तो पुन्हा मानवी वसाहतीत येऊ नये यासाठी नागोठण्यापासून लांब अशा सुकेळी येथील घनदाट जंगलात त्याला सोडण्यात आले असले तरी नागोठण्यात यापूर्वी कधी एवढा मोठा अजगर आल्याचे ऐकिवात नसल्याने हा अजगर मानवी वसाहतीत आला तरी कोठून या प्रश्नावर तर्क-वितर्क काढण्यात येत आहेत.

कै.पांडुरंग चांगु (बापु) पाटील यांची पुण्यतिथी साजरी

दै.रायगड नगरी । उरण

नागाव मांडल आळी येथील शतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते काका पाटील यांचे प्रिताश्री कै पांडुरंग चांगू (बापु) पाटील यांची पुण्यतिथी ६नोहेंबर २०२० रोजी आज पाटीलवाडी येथे साजरी करण्यात आली.

या प्रसंगी कार्यक्रमाला पंचायत समिती सभापती सागर कडू, उद्योजक राजा पडते, शिवसेना उपजिल्हा प्रमुख नरेश रहालकर, म्हातवली सरपंच आंनद घरत, ॲड प्रदीप पाटील उदोजक सुनील पाटील, यतीन पाटील जनार्दन थळी, हरेश्वर थळी, आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी कै पांडुरंग बापु यांच्या अर्ध पुतळ्याला पुष्प हार अर्पण करुन नम्र अभिवादन केले. या कार्यक्रमात माजी दिवंगत भारतातीय क्रिकेट संघाचे क्रिकेटपटू कै अजित वाडेकर यांनी स्थापन केलेल्या आखील भारतीय अपंग क्रीडा फोंडेशन या संस्थेला श्रीराज चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे सागर काका पाटील यांनी १५०००चा धनादेश सागर कडू यांच्या कडे सुपूर्त करण्यात आला. त्याच प्रमाणे स्मृती स्मरणार्थ नविन पनवेल येथील शांतिवन कृष्ठ रोग आरोग्य संस्थेतील रूग्णांना स्नेह भोजनाचा लाभ पुष्कर प्रदीप पाटील व प्रतीक सुनील पाटील यांच्या तर्फे देण्यात आला. या प्रसंगी काका पाटील यांनी आपल्या भावना व्येक करताना बापुंच्या आठवणीनींना उजाळा देत त्यांनी केलेल्या समाज कार्या बद्दल उपस्थितांना माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मांडल आलीतील तरुण प्रफुल्ल पाटील,दत्ता घरत बाबू ठाकुर यांनी परीश्रम घेतले तर आभार यतीन पाटील यांनी मानले.

या राज्यात ३१ डिसेंबरपर्यंत शाळा बंदच, सरकारचा आदेश जारी

दै.रायगड नगरी । मुंबई

देशात अनलॉक तर महाराष्ट्र शासनाने मिशन बिगेन अगेन म्हणत सर्वच क्षेत्रात पुनश्च हरिओमला सुरूवात केली आहे. वाहतुकीची साधने, प्रवास व्यवस्था, नाट्य, सिनेमागृह, बाजारपेठ सुरळीतपणे सुरू केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर माध्यमिक शाळेतील नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याचा मानस शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी व्यक्त केला आहे. तर, दुसरीकडे ओडिशा सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत शाळा बंदच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ओडिशा राज्य सरकारने तसा आदेशच काढला आहे.

देशात सर्वाधिक कोरोना रुग्णसंख्या असलेल्या महाराष्ट्रात शाळा सुरू करण्यासंदर्भात हालचाली सुरू आहेत. राज्यातील कोरोनाची परिस्थिती पाहूनच २३ नोव्हेंबर २०२० पासून राज्यातील शाळा चालू करण्याबाबत एसओपी तयार करण्यात आली असून त्याबाबत माननीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आली आहे.

मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड
फेर जाहीर निविदा सूचना

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता नगरपरिषदेच्या सर्व विभागाकरिता आवश्यक साहित्याकरिता वार्षिक दरपत्रक मागविणे विषयी तपशिल खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	कामाचे नांव	कोरी निविदा पत्रकाची किंमत रु.	इसारा रक्कम रु.
१	संगणक हार्डवेअर सिस्टीमकरिता नामांकित कंपनीचे साहित्य पुरविणे व सर्व्हिसिंग करणे व संगणक पुरविणे	२००.००	१०००.००
२	न.प.कार्यालयाकरिता इंटरनेट सेवा पुरविणे	१००.००	५००.००
३	नगरपरिषदेकरिता नामांकित कंपनीचे प्रिंटर पुरविणे	१००.००	५००.००
४	नगरपरिषद कार्यालयातील C.C.T.V ची दुरुस्ती करिता आवश्यक त्या साहित्याचा पुरवठा करणे	१००.००	५००.००
५	कार्यालयीन छपाईचे कामाकरिता छपाईचे दर देणे	१००.००	५००.००
६	न.प.कार्यक्रमासाठी छायाचित्रण व व्हि.डी.ओ. शुटींग करणे	१००.००	५००.००
७	न.प.कार्यक्रमासाठी हजार, गुच्छ, बुके पुरविणे	१००.००	३००.००
८	स्मशानभूमीकरिता जळाऊ लाकडे पुरविणे	२००.००	५००.००
९	पाणी पुरवठा विभागात CID जॉईंट टर्निंग करणे व वेल्डींगचे काम करणे	१००.००	५००.००
१०	पाणी पुरवठा विभागात इलेक्ट्रीक पंप खरेदी व दुरुस्ती तसेच पॅनल बोर्ड दुरुस्ती करणे	१००.००	५००.००
११	जलशुद्धीकरण केंद्र येथे क्लोरीन गॅस सिलेंडर रिफिलींग करणे व देखभाल दुरुस्ती करणे	१००.००	५००.००
१२	पाणी पुरवठा विभागातील जनरेटरची देखभाल व दुरुस्ती करणे	२००.००	१०००.००

शर्ती व अटी :-

१) कोरी निविदा फॉर्म निविदा सूचना प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून दिनांक १८/११/२०२० पर्यंत न.प.च्या अभिलेख कक्षात उपलब्ध करून घेता येतील.

२) जाहीर निविदा सूचनेत नमूद केल्याप्रमाणे इसारा रक्कम निविदा सूचना प्रसिद्ध झालेपासून दिनांक १९/११/२०२० रोजी सायं.४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात रोखीने स्वीकारण्यात येतील. इसारा रक्कमेचा पावतीची छायांकित प्रत सिलबंद लखोट्यावर चिकटविण्यात यावी.

३) सिलबंद वार्षिक दराच्या निविदा दिनांक २०/११/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

४) प्राप्त सिलबंद निविदा शक्यतो त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता मुख्याधिकारी यांचे दालनात हजर असलेले निविदाकार किंवा त्यांचा प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

५) निविदे सोबत आयकर, विक्रीकर, अनुभवाचा दाखला व अधिकृत विक्रेते असलेले अद्ययावत दाखले व इसारा रक्कम भरल्याची पावती स्वतंत्र लिफाफ्यामध्ये ठेवावी. सदर लखोटे प्रथम उघडण्यात येतील व समाधानकारक कागदपत्रे असल्याची खात्री झाल्यानंतर सिलबंद दराचा लखोटा उघडण्यात येईल. अन्यथा अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

६) मंजूर निविदाकाराने योग्य त्या किंमतीच्या मुद्रांक शुल्कावर करारनामा लिहून द्यावा लागेल.

७) कोणतीही निविदा अगर सर्वच निविदांबाबत कोणतेही कारण न देता नाकारणेचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

म्यु.जा.क्र.८७४/अभि/२०२०-२१
मुरुड जंजिरा नगरपरिषद, कार्यालय,
मुरुड जंजिरा, जि.रायगड
दिनांक : ०६/११/२०२०

सही/-
मुख्याधिकारी
मुरुड जंजिरा नगरपरिषद

सही/-
अध्यक्ष
मुरुड जंजिरा नगरपरिषद

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

पृष्ठ क्र.१ वरुन...

कोकणवासियांच्या मदतीला येणार वीज प्रतिरोधक यंत्र

केंद्र शासनाला मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आला आहे.

ही केवळ रायगड जिल्ह्यापुरतीची गरज नसून याचा उपयोग शेजारील रत्नागिरी, सिंधुदूर्ग, या भागात कोणत्याही प्रकारची आपत्ती उद्भवल्यास तेथेही निश्चितच होईल, याचा दूरगामी विचार करुन सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी एकूण ११८ वीज प्रतिरोधक यंत्रे बसविण्यासाठी एकूण १ कोटी ६७ लक्ष आणि ठाणे जिल्ह्यासाठी ३०७ वीज प्रतिरोधक यंत्रे बसविण्यासाठी एकूण १ कोटी ८० लक्ष ५० हजार रुपयांचा प्रस्ताव राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प व्यवस्थापकांकडे मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आला आहे.

मुजोर ग्रामसेवकाची बदली करा

जैव विविधता समिती सचिव म्हणून काम करणे, विवाह नोंदणी निबंधक कामकाज करणे, आपत्कालीन समिती सचिव म्हणून काकाज करणे, झाडे लावणे,शोछालय बांधून ते वापरायला शिकविणे, ग्रामसभेचा सचिव म्हणून कामकाज करणे ही कामे असतात.परंतु स्थानिक समस्या सोडविताना ग्रामसेवकाची अरेरावी,ग्रामस्थांना विकास योजनेची माहीती न देणे ग्रामपंचायतीत गैरहजर राहुन फुकटचा पगार घेणे असे उपक्रम सुरु आहेत. भारतीय जनता पार्टीच्या ज्योती पायगुडे यांच्याकडे सुशिक्षित सरपंच म्हणुन आपली छाप पाडली आहे.त्यांच्या ग्रामपंचायतीत अरेरावी करणारया ग्रामसेवका बाबतीत त्यांनी आवाज उठवला असुन ईतर ग्रामपंचायतीतील सरपंचना देखील याचा त्रास होत असुन त्यांनी देखील योग्य पाऊले उचलुन आपल्या ग्रामपंचायतीचा विकास करण्याचे आवाहन सौ.ज्योती पायगुडे यांनी केली आहे.

५० मेगावॉट वीजनिर्मितीच्या सबस्टेशनची उभारणी

करून उभारण्यात येत असलेल्या या वीजनिर्मितीच्या सबस्टेशन उभारण्याच्या कामावर सुमारे ५० कोटी खर्च करण्यात येत आहे. फक्त जेएनपीटी सेझ प्रकल्पासाठीच पहिल्यांदाच ओव्हर हेड लाईनचा वापर करून वीज निर्मिती केंद्र उभारण्यात येत आहे. या उभारण्यात येत असलेल्या सबस्टेशनमुळे सेझमधील व्यावसायिकांना १२ ते १३ रुपये प्रति युनिट इतक्या कमी दरात वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे.

तसेच सबस्टेशन उभारणीमुळे वीजपुरवठाही खंडित होणार नसुन अखंडपणे सुरळीतपणे सुरू राहणार आहे. यासाठी सबस्टेशन एमएसईबीसोबत टायप करण्याचे जेएनपीटीचे प्रयत्न सुरू आहेत. कोरोनामुळे या सबस्टेशन उभारण्याचे काम लांबणीवर पडले होते. मात्र सध्या जलदगतीने सुरू असलेल्या कामामुळे सबस्टेशन उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यामुळे सेझ प्रकल्पाला वीजपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र ५० मेगावॉट वीज निर्मितीचे सबस्टेशन येत्या डिसेंबर अखेरपर्यंत कार्यान्वित होईल असा विश्वास जेएनपीटी अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

निवडणुकांची प्रक्रिया नव्याने राबवा

सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

सदर प्रकरणी आजरोजी ७ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लोटून गेलेला आहे.उमेदवारी दाखल केलेल्या अनेकांना कोविड १९ मुळे निवडणूक प्रक्रियेस विलंब झाल्याने ते चिंताग्रस्त आहेत तसेच कित्येक नवमतदार वयोमर्यादेने उमेवारीस पात्र ठरलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी झालेला दिर्घ काळ लक्षात घेऊन व नव्याने उमेदवारीस इच्छुकांची संधी हिरावली जावू नये यासाठी सदर निवडणूक प्रक्रिया नव्याने व जलद गतीने राबविण्यात येण्याची गरज असल्याचेही शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार भाई जयंत पाटील यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

कोविड योद्धा विजय सुर्वेचा सन्मान

दै.रायगड नगरी । आगरदांडा

कोरोनाच्या संकटात जीवावर उदार होऊन लोकांचे संरक्षण करणाऱ्या विजय सुर्वे यांना वेंतूर फाउंडेशन ठाणे या संस्थे तर्फे संजीवनी आरोग्य सेवा संस्थेचे अध्यक्ष- विक्रांत राऊळ यांच्या शुभ हस्ते सन्मान पत्र देवून कोरोना योध्दा म्हणुन सन्मानित करण्यात आले.

यावेळी वेंतूर फाउंडेशन ठाणे या संस्थे तर्फे संजीवनी आरोग्य सेवा संस्थेचे अध्यक्ष- विक्रांत राऊळ, डॉक्टर - बिरावटकर , आरोग्य विभागाचे अधिकारी आदिसह मान्यवर उपस्थित होते. कोविड -१९ या कोरोना संकटाशी लढताना, लोकांमध्ये जनजागृती करण्याकरिता डॉक्टर, आरोग्य विभागाचे अधिकारी यांच्या बरोबर मुरूड शहरातील घरोघरी जावुन नागरिकांची आरोग्य तपासणी करिता मदत करण्याचा काम करण्याचे काम केले. त्या बरोबर शासनाने कोरोनाची साखळी तोडण्याकरिता माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम सुरू करण्यात आली होती. ही मोहिम नगरपरिषद तर्फे दोनदा संपुर्ण शहरात राबविण्यात आली. त्या मोहिमेत उत्कृष्ठ कामगिरी करून मोहिम यशस्वी करणेकरीता सर्वतोपरी प्रयत्न केल्याने समाजसेवक- विजय सुर्वे यांना सन्मानित करण्यात आले.

मोबाईलसह रोख रक्कमेची चोरी

दै.रायगड नगरी । मुंबई

मोबाईलसह रोख रक्कमेची चोरी केल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.

नानोशी येथील तुळशी अंकुश गिरा या आपल्या पतीसह शेतात गेल्या असताना त्यांच्या शेजारी राहणाऱ्या एका इसमाने त्यांच्या घरात पाठीमागील दरवाजाची कडी उघडून प्रवेश केला व घरातील ५ हजार रुपयाचा मोबाईल व ८ हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेल्याची तक्रार देण्यात आली आहे.

उरण तालुक्यात २३ रुग्ण आढळले, दोन रुग्णांचा मृत्यु

दै.रायगड नगरी । उरण

शुक्रवार (दि. ६ नोव्हेंबर) रोजी कोविड -१९ कोरोना पॉझिटीव्ह २३ रुग्ण आढळले, दोन रुग्णांचा मृत्यु व १५ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.

आढळलेल्या रुग्णांमध्ये नेव्हल स्टेशन करंजा दोन, कस्टम हाऊस उरण दोन, बोरीपाखाडी दोन, नवापाडा दोन, जांभूळपाडा दोन, पिरकोन दोन, श्री राम समर्थ अपार्टमेंट बालई रोड दोन, द्रोणागिरी सिडको कॉलनी, नागाव, पाणदिवे, धुतुम, मोरा रोड, उरण, जासई, जसखार, सोनारी येथे प्रत्येकी एक असे एकूण २३ रुग्ण अढळले आहेत व १५ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.

तर उरण व हनुमान कोळीवाडा येथे प्रत्येकी एक असे एकूण दोन रुग्णांचा मृत्यु झाला आहे. उरण तालुक्यातील कोरोना रुग्णांची संख्या २१०९ झाली आहे.

सुरक्षारक्षकासोबत ओळख वाढवून त्याची फसवणुक करणाऱ्या भामट्याचा पोलिसांकडुन शोध सुरु

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल मधील एका इमारतीवर कामास असलेल्या सुरक्षारक्षकासोबत विजय सिंग नावाच्या भामटयाने ओळख वाढवून, त्याच्याकडून घरी फोन लावण्याच्या बहाण्याने मोबाईल फोन घेऊन त्यावरुन गुगल पेच्या माध्यमातून ६० हजार रुपये स्वत:च्या खात्यात वळते करुन सुरक्षारक्षकाची फसवणुक केल्याची घटना उघडकिस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या भामटयावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार सुरक्षारक्षक संजय रावत हा पनवेलच्या मिडलक्लास सोसायटीत सुरक्षारक्षक म्हणुन कामाला असून तो त्याच ठिकाणी रहाण्यास आहे. संजय रावत हा आपल्या कामावर असताना, सायंकाळच्या सुमारास भामटा विजय सिंग आला होता. यावेळी त्याने सुरक्षारक्षक संजय रावत याच्याकडे वॉचमनचे काम आहे का?अशी विचारणा करुन त्याच्यासोबत ओळख वाढविली. यावर संजय रावत याने त्याच्या परिचयातील संजय सिंगकडे काम असल्याचे सांगुन त्याला थांबवून घेतले. यादरम्यान, भामटया विजय सिंग याने संजय रावत याला त्याच्या बँक खात्यात पैसे कमी असल्याचे सांगून त्याला ५२० रुपये देऊन सदर रक्कम गुगल पेवरुन त्याच्या खात्यावर पाठविण्यास सांगितले. त्यानुसार संजय रावतने ५२० रुपये घेऊन त्याच्या गुगल पेवरुन भामटया विजय सिंगच्या खात्यावर ५२० रुपये पाठवून दिले. यादरम्यान, त्याठिकाणी संजय सिंग आल्यानंतर त्याने विजय सिंगला आपल्या सोबत काम देण्यासाठी नेले. त्यानंतर भामटा विजय सिंग पुन्हा संजय रावत याच्याकडे आला.

यावेळी त्याने त्याच्या मोबाईलमधील बॅलेन्स संपल्याचे व त्याला घरी फोन करायचे आहे, असे सांगुन संजय रावत याच्याकडुन त्याचा मोबाईल घेतला. त्यानंतर संजय रावत जेवण बनविण्यात व्यस्त असल्याचे पाहून भामटया विजय सिंग याने संजय रावत याच्या मोबाईलवरुन गुगल पेच्या माध्यमातून त्याच्या बँक खात्यातील २० हजार रुपयांचे तीन ट्रान्झेक्शन करुन ६० हजाराची रक्कम स्वत:च्या खात्यात वळती करुन घेतली. त्यानंतर त्याने संजय रावत याला मोबाईल फोन देऊन त्याठिकाणावरुन पलायन केले. त्यानंतर संजय रावत याने आपल्या मोबाईल तपासणी केली असता, त्याच्या खात्यातून ६० हजाराची रक्कम वळती झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याने भामटया विजय सिंग याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो त्याला सापडला नाही. त्यामुळे संजय रावत याने बँकेतुन आपल्या खात्यातील व्यवहाराची माहिती घेऊन पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

मोकाट गुरे, भटक्या कुत्र्यांमुळे पालीकरमध्ये नागरिक त्रस्त

दै.रायगड नगरी । गौसखान पठाण

सुधागड/पाली : पाली ग्रामपंचायत हद्दीत मोकाट गुरे व भटक्या कुत्र्यांच्या दशहतीमुळे नागरिकांना हैराण केले आहे. कुत्र्यांप्रमाणेच शहरातील रस्त्यांवर मोकाट गुरांमुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक, पदपथावरील व्यावसायिक, भाजी व फळविक्रेते, वाहतूकदारांना त्रासाचे होत आहे. शहरांत मोकाट गुरांचे प्रमाण वाढत असताना ग्रामपंचायत प्रशासन काय करीत आहेत, असे प्रश्न नागरिकांकडून विचारण्यात येत आहेत.

मोकाट गुरे व भटक्या कुत्र्यांमुळे पालीकर हैराण झाले आहेत. गुरांवर मालकांचे व पाली ग्रामपंचायतीचे नियंत्रण नसल्याने वाहतूककोंडीची समस्याही बळावत आहे. पहाटे अथवा रात्री उशिरा येणारे पादचारी, दुचाकीवाहनांच्या मागे कुत्रे लागत असल्याचे त्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. त्यामुळे अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही.

मोकाट गुरांची योग्य व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात यत आहे. लहान मुलांना खेळताना, तसेच ज्येष्ठ नागरिक भययुक्त वातावरणात फिरताना दिसतात.अनेक वेळा शहरांत मोकाट गुरामुळे शहरात वाहतूककोंडीची समस्या उद्भवते. याशिवाय अपघातचे प्रसंगही ओढावले आहेत.

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात वारस दाखला, नावात बदल,
मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र
बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा
फोन नं. : 022-27469434 / 9619737911 / 9619979706
कार्यालय : १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, जुने स्टेन टॉकीज समोर टिळक रोड, पनवेल
Email : raigad.nagari@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकतीमध्ये श्री.चिंतामण सिंधू पाटील, रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड यांचा अविभाजित हिस्सा असून सदर मिळकत त्यांच्या सामाईक मालकीची असून सदर मिळकत त्यांचे कसवणुकीत व ताबेकब्जात आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड

अ. क्र.	स नं.	हि नं.	क्षेत्र लागवडीयोग्य हे.आर.पॉ.	क्षेत्र पोटखराबा हे.आर.पॉ.	क्षेत्र एकूण हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	७९	-	०-५७-९	०-०१-०	०-५८-९ पैकी ०-१६-००	३.५६

आमचे अशिल १) श्री.सुखदेव मुंगा मुंबईकर, २) श्रीमती.मंजुळा सुखदेव मुंबईकर, दोघांचा पत्ता : घर क्र.८७१, भोईरपाडा, दत्त मंदिराजवळ, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड यांनी सदरची मिळकत सदर मिळकतीचे सहमालक श्री.चिंतामण सिंधू पाटील यांचेकडून त्यांचे हिश्श्याचे एकूण क्षेत्रापैकी ०-१६-०० हे.आर.पॉ. मोजमापीचे क्षेत्र मोबदल्यापोटी कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाईक आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्या प्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधी व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आमच्या कार्यालयात सादर करावेत.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री.चिंतामण सिंधू पाटील यांचा मालकी हिस्सा, हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.६/११/२०२०

सही/-
श्री.सचिन पुंडलिक केणी, ॲडव्होकेट पनवेल
गाळा क्र.४, गुरु आशिष बिल्डींग, जुने पोस्ट ऑफिस जवळ, महात्मा फुले मार्ग, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६
मो.नं.९९२०९७३४६७/८८५०८३९५८८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की मौजे- चिंध्रण, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत माझे अशिल सौ.सबा परविन सैफुल्ला अहमद, पत्ता- सी/ ४०३, साई अपार्टमेंट, उमर वाडी, कुरेश नगर, कुर्ला (पु.), मुंबई- ४०००७० यांनी खालील जमिन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड

गट क्रं./ उपविभाग	भूधारणा पद्धती	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.	जमीन मालकाचे नाव
२६/२	भो वर्ग १	२-४४-०० पो.ख.०-०४-०० एकूण २-४८-००	६.४५	पैकी एकनाथ चांगो देशेकर यांचा अविभक्त हिस्सा ०-२७-५२ पैकी ०-०६-०० हे.आर.चौ.मी.

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी सांमज्यस्य करार, विकीचा करार, मक्ता, रस्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार वकील यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोच-वावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने वा कुरीयरने दाखल कराव्यात. वरील कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती तक्रारी, दावे माझे अशिलांवर बधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी

पनवेल
दि.६/११/२०२०

सही/-
ॲड.नरेश गणपत ठाकूर
साई प्रसाद निवास, कोपरा खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०
मो.नं.९३२४०८०२५४

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमच्या पक्षकाराने १) श्रीमती.शैलजा नथुराम म्हात्रे, रा.केगाव, दे-वळी, ता.उरण, जिल्हा : रायगड, २) श्रीमती.माधवी मधुकर पाटील, रा.बी४/४०१, मोहन रिजन्सी, आधारवाडी जेल रोड, कल्याण (प), ३) श्रीमती.शलाका सदाशिव पाटील, राहणार : ३०८, लव कुश अपार्टमेंट, खांडवाला कंपाऊंड, वाकोला ब्रीज, सांताक्रुज (पु.), मुंबई ४०००५५ ४) श्रीमती.नंदा घनश्याम वर्तक, राहणार : ६०५, नेमिनाथ पॅटेस, ६ वा मजला, मिलेट्री कॅम्प चौकी, रिद्धी पॅलेस मागे, सांताक्रुज (पू.), ह्यांच्या मालकीची मौजे : पारगाव, डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड, येथील सर्व्हे नं.३३, हिस्सा नं.३, क्षेत्र सुमारे १ एकर, ६१ गुंठे, ८ आणे ह्या मिळकतीच्या संपादनापोटी सिडको खात्याकडून अदा होणाऱ्या भूखंडाबाबत आमच्या पक्षकाराने साठेखत केलेला आहे. सदर भूखंडाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे :-

गाव	सेक्टर क्र.	भूखंड क्र.	क्षेत्र सुमारे
पुष्पक नगर, दापोली	४	१६	२५५० चौरस मीटर

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदरहू वर नमूद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत व साठेखताबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास सदर हरकत लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह खालील नमूद केलेल्या पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत न चुकता द्यावी. सदरहू मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची लेखी हरकत योग्य त्या पुराव्यासह आली नाही तर आमचे पक्षकार वरील भूखंडाबाबत व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या हरकतीबाबत कसलीही दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २९/१०/२०२०

सही/-
ॲड.राजेश द.तांडेल
ऑफिस नं.बी.४०१, विष्णू कॉम्प्लेक्स, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, ता. व जि.ठाणे, नवी मुंबई

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत, त्या शेतमिळकतींचे विद्यमान शेतजमीन मालक यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून तसा करार उभयपक्षी यांचेत स्वाक्षरीत झाला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड मिळकतींचे वर्णन

शेतजमीन मालकांचे नाव व गाव	गट क्रमांक	उप विभाग	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार
१) श्री.सदानंद जगन्नाथ पवार २) श्री.संतोष जगन्नाथ पवार ३) सौ.अश्विनी अशोक चाळके ४) सुवर्णा पांडुरंग मोरे ५) सौ.राजश्री रवींद्र राणे ६) सौ.मोहिणी यशवंत मोरे ७) सौ.सुजाता सुधाकर पालंडे ८) श्रीमती.सत्यभामा जगन्नाथ पवार रा.मु.लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड	९०	५	०-३५-४०	५.००

वर वर्णन शेतजमीन मिळकत या शेतजमीन मालक यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबे, कब्जा वहिवाटीतील असून, ती शेतजमीन विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान शेतजमीन मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचेही विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीकरार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, कब्जा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, कुळहक्क, दिवाणी दावा महसूल वाद अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांचे हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत खालील आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात आणून द्यावीत. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकती ही विद्यमान शेतजमीन मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तीचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान शेतजमीन मालकांच्या तसेच आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०६/११/२०२०

सही/-
ॲड.डि.पी.घरत
शॉप नं.३१, पहिला मजला, पनवेल महानगरपालिका कॉम्प्लेक्स, कृष्णाळे तलावाचे विरुद्ध वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे बाजूला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९२२२५८५८००/८०८०५८५८४८

श्री.भाकरे सो.कोर्ट
अर्जदारांतर्फे वकील प्रशांत भुजबळ

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.४९४/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.१०/१२/२०२०

१) कु.प्रतिका पांडुरंग कोंडीलकर
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
२) कु.प्रणिल पांडुरंग कोंडीलकर
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
दोघेही अज्ञान असल्याने त्यांच्या वतीने
अज्ञान पालनकर्ते वडील
श्री.पांडुरंग भाऊ कोंडीलकर
सर्व रा.कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.सारिका पांडुरंग कोंडीलकर यांचे निधन दि.२९/१२/२०१९ रोजी झालेले आहे. तसेच कै.सारिका पांडुरंग कोंडीलकर यांचे वडील कै. नागनाथ शिवा म्हात्रे यांचे निधन दि.०६/०१/२००६ रोजी झाले आहे. तसेच कै.सारिका पांडुरंग कोंडीलकर यांचे आजोबा म्हणजेच कै.नागनाथ शिवा म्हात्रे यांचे वडील कै.शिवा उंदऱ्या उर्फ उंदीर म्हात्रे निधन दि.१२/०५/१९९४ रोजी झाले आहे. कै.सारिका पांडुरंग कोंडीलकर यांच्या सामाईक मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड

गावाचे नांव	यु.केस नं.	स.नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
कामोठे	२३	१७१	२	०-०५-८	०.४१
		१७१	३	०-०३-०	०.२२
		१७३	२	०-०७-३	१.४४
		१७३	३ बी	०-१३-४	२.६९
		१७५	३	०-०९-६	१.६९
		१८७	६	०-०४-६	०.५३
		१८९	४	०-१८-५	३.४५
		४४	४	०-०५-३	०.१९
		४५	४ बी	०-१३-९	१.३१
		५३	४+६ बी	०-०८-३	०.३१
		६१	७ पी	०-००-३	०.०८
		६२	२ पी	०-०४-३	०.५३
		६२	३ पी	०-००-५	०.१२
		६४	४अ+६पी	०-०८-१	०.८१
		६५	११	०-०६-०	०.१९
		६८	७	०-०८-०	०.२०
		६८	२०	०-२०-०	-
		७३	१	०-२७-५	३.५१
		७३	८ बी	०-१३-९	२.००
		७३	९	०-१२-६	१.६९
		७४	८ पी	०-१२-८	१.२२
		८४	३	०-१२-६	२.५०
		८५	३-७-४-५/अ ११-१२,१५-१३	०-४५-७	६.२६
		१३१	६	०-०९-९	२.१२
		१३७	५	०-०२-३	०.२५
		१३९	६	०-०४-८	०.४१
		१३९	१०	०-०८-६	१.८०
		१४५	७	०-०५-६	०.५३
		१५०	२	०-०३-३	०.५९
		१५२	२+४+५	०-२७-०	६.०६
		१५३	१	०-०२-८	०.४१
		१५६	३	०-०२-०	०.०३
		३६४	१	०-०८-०	१.४४
		८४	१ बी	०-१४-७	२.६२
कामोठे	२३ (१)	८३	७	०-०६-६	१.१९
		८४	४ बी	०-०५-८	०.९४
कामोठे	२३ (२)	८२	८	०-०६-०	०.७५
		८२	७	०-०५-८	०.७५
		८२	५	०-०८-४	१.०५
		७९	१+२ अ	०-०८-१	०.८७
		७५	२+३+११ ते १४ +१६ ते १८ ए	०-३३-९	४.८८
कामोठे	४६५	६२२	१३	०-२९-८	१.६९

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.शिवा उंदऱ्या उर्फ उंदीर म्हात्रे यांचे वारस म्हणून कै. सारिका पांडुरंग कोंडीलकर यांच्या नावे सामाईकपणे मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.३ बी, सेक्टर नं.४७, क्षेत्र ७०० चौ.मी. व भूखंड नं.५९, सेक्टर नं.१०, क्षेत्र २५० चौ.मी. व भविष्यात मिळणारा १०० चौ.मी. असा एकूण १०५० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात येणार आहे. कु.प्रतिका पांडुरंग कोंडीलकर वगैरे हे कै.सारिका पांडुरंग कोंडीलकर यांचे कायदेशीर वारस आहे, ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट कु.प्रतिका पांडुरंग कोंडीलकर वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सारिका पांडुरंग कोंडीलकर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.६/११/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

मोटार सायकलची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

पाडेघर बस स्टॉपजवळ असणाऱ्या पार्किंगमध्ये उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

नरेश कडू यांनी त्यांची २५ हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची ड्रिम युगा मोटार सायकल क्र.एमएच-४६-एएम-३७७० रंग काळा-लाल ही पाडेघर बस स्टॉपजवळ असणाऱ्या पार्किंगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटार सायकल चोरुन नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अल्पवयीन मुलीचे अपनयन

दै.रायगड नगरी । पनवेल

एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे एका इसमाने अपनयन केल्याची घटना पनवेल जवळील भिंगारी गावात घडली आहे.

येथील १७ वर्षीय मुलीचे एका इसमाने अपनयन केले असून तीचे वय १७ वर्षे ७ महिने २९ दिवस आहेत. रंग निमगोरा, उंची ५ फूट ५ इंच, नाक सरळ, उजव्या भुवयाच्यावर जुन्या जखमेचा व्रण, केस काळे लांब, कानात झुमके, उजव्या हाताच्या तर्जनीमध्ये लोखंडी अंगठी, डाव्या पायात लोखंडी कडे, दोन्ही पायात लोखंडी पैंजण असून अंगात राखाडी रंगाचा सलवार व गुलाबी रंगाचा कमिज, तसेच गुलाबी व हिरव्या रंगाची ओढणी आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक बी.जी.बाबर यांच्याशी संपर्क साधावा.

शेकापच्या नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर यांच्या मागणीला यश

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या खाजगी डॉक्टरांना शासन दराने पीपीई कीट उपलब्ध करुन देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या नगरसेविका डॉक्टर सुरेखा मोहोकर यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली होती. या मागणीला उत्तर देत खासगी डॉक्टरांनी जर महानगरपालिकेकडे मागणी केल्यास शासन दराने पीपीई कीट उपलब्ध करून दिले जातील असे उत्तर वैद्यकीय आरोग्य अधिकारी पनवेल महानगरपालिका यांनी डॉ सुरेखा मोहोकर यांना कळविले आहे.

बाहेर पीपीई किट जास्त दरात मिळत आहेत. त्यामुळे पीपीई कीट खरेदी करण्यासाठी जास्त रुपये द्यावे लागत आहेत. त्याच अनुषंगाने मोहोकर यांनी शासन दराने पीपीई कीट उपलब्ध करून देण्यासाठी निवेदन दिले होते. त्यांच्या या मागणीला यश आले आहे.

अष्टमी येथील हनिफ दर्जी यांनी रस्त्यात सापडलेले सव्वा लाख रुपये केले परत

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊन घोषित झाल्यापासून सर्वत्र सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. त्यातच नैसर्गिक आपत्ती आणि वाढत्या महागाईमुळे जगणे मुश्किल झाले आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसाला रस्त्यात अनावधानाने एखादी बक्कल रक्कम मिळाली तर 'सोन्याहून पिवळ' होय अस म्हटलं तर वावगं ठरणार नाही मात्र अष्टमी मुस्लिम समाजाचे खजिनदार सामाजिक कार्यकर्ते हनिफ दर्जी यांनी त्यानं नाक्यावर भर रस्त्यात मिळालेली जवळपास सव्वा लाख रुपयांची रोखड संबधीत मालकाला इमान इतबारे परत केली. हनिफ दर्जी यांच्या कौतुकास्पद कामगिरी बद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

रोहे अष्टमी येथील एक चिकन विक्रेता तरुण आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून गुरुवारी सकाळी १० :३० च्या सुमारास बँकेत भरणा भरण्यासाठी मोटारसायकल वरून जात असताना त्याच्या खिशातील पैसे भरलेली पिशवी अष्टमी नाक्या जवळ पडली. सदर पैशाने भरलेली पिशवी या दरम्यान अष्टमी मुस्लिम समाजाचे खजिनदार श्री. हनिफ दर्जी हे याच रस्त्यावरून मार्गक्रम करीत असताना त्यांच्या निदर्शनास आली. दर्जी यांनी सदर घटना गावातील दोन इस्माना सांगितली. काही वेळात या मार्गावर सदर चिकन विक्रेता हरवलेली पैशांची पिशवी शोधत असल्याचे दृष्य श्री. हनिफ दर्जी व अन्य दोन इस्मानी बघितले. व विचारपूस केली. सदर तरुणाने हरवलेल्या पिशवी व १ लाख २० हजार रक्कम विषयी व्यवस्थित माहिती दिली. दिलेल्या माहितीची खात्री पटल्यानंतर दर्जी यांनी दोन साक्षीदार यांच्या साक्षीत सदर रक्कम त्या तरुणाला परत दिली. काही काळ भेदरलेल्या तरुणाला आपल्या हक्काची रक्कम परत मिळाल्याने त्याने दर्जी यांचे आभार मानले.तर दुसरी कडे दर्जी यांच्या इमानदारी बद्दल त्यांचे कौतुक होत आहे. अर्थातच प्रामाणिकपणा दुर्मिळ झालेला असला तरी हनिफ दर्जी यांच्या सारखे प्रामाणिक माणसं अद्याप आहेत असच काहीसं या घटनेवरून म्हणावे लागेल.

पोलादपूर नगरपंचायतीची गाडी पुरेशा कर्मचाऱ्यांविनाच चालविण्याचे मुख्याधिकारी लबडे यांच्यासमोर आव्हान

निवडणुकांचीही तयारी सुरू ; करआकारणी वाढविण्याची संधी मिळाल्यास नगरपंचायतीला स्वनिधी

दै.रायगड नगरी । शैलेश पालकर

पोलादपूर : पोलादपूर तालुक्याची ग्रामपंचायत असल्याने नगरपंचायतीमध्ये रूपांतर झालेल्या नगरपंचायत पोलादपूरच्या कार्यालयीन कामकाजासह प्रशासकीय कामकाजामध्ये अपुऱ्या कर्मचारी संख्येचा अडसर कायम असून ग्रामपंचायतीमध्ये सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना समावेशनाशिवाय नगरपंचायतीचे काम करावे लागत असल्याच्या समस्येकडे गेल्या साडेसार वर्षात शासनाने लक्ष दिले नाही. परिणामी, पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विराज लबडे यांना नगरपंचायतीचं गाडं पुरेशा कर्मचाऱ्यांविनाच चालविण्यासह पंचवार्षिक निवडणुकांची तयारी करावी लागत असल्याने पोलादपूर नगरपंचायतीच्या भविष्यातील महत्वाच्या प्रश्नांबाबत नियोजन करण्यासंदर्भात जराशीही उसंत मिळत नसल्याचे प्रस्तुत प्रतिनिधीने प्रत्यक्ष चर्चा केली असता दिसून आले आहे. यावेळी नगरपंचायतीचा स्वनिधी तयार होण्याकामी करआकारणीमध्ये वाढ करण्याची मंजूरी मिळाल्यास विविध महत्वाच्या कामांसाठी नगरपंचायतीला स्वतच्या उत्पन्नाची तरतूद उपलब्ध होऊ शकणार आहे.

पोलादपूर नगरपंचायतीमध्ये आकृतीबंधानुसार रिक्त मंजूर पदांची भरती अद्याप झाली नसताना दुसरीकडे ग्रामपंचायतीचा जुना कर्मचारीवर्ग समावेशनाअभावी केवळ पुर्वीच्याच पगारावर काम करीत असल्याचे दिसून आले आहे. परिणामी, अनुभवी कर्मचाऱ्यांना अर्धबेकारी पत्करावी लागली आहे. पोलादपूर ग्रामपंचायतीचे १ मार्च २०१४ रोजी नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाले आहे. यानंतर राज्यसरकार संवर्ग सेवानिहाय पदसंख्या मंजूर करण्यात आली आहे. ब श्रेणीचे स्थापत्य व अभियांत्रिकी सेवा १ पद मंजूर असूनही रिक्त आहे. क श्रेणीची लेखापाल व लेखापरिक्षक मंजूर पदे दोन असून १ रिक्त आहे. करनिर्धारण व प्रशासकीय सेवा ब श्रेणीचे १ पद आणि क श्रेणीचे १ पद रिक्त आहे. विकास सेवा क श्रेणीचे १ पद मंजूर असूनही ते रिक्त आहे. त्यामुळे या सर्व संदर्भ क्रमांक १ पैकी ६ मंजूर पदांपैकी ३ पदे रिक्त असून ३ पदे भरलेली आहेत. याखेरिज, संदर्भ क्रमांक ३ राज्यस्तरीय संवर्गातील पदांव्यतिरिक्त लिपिक टंकलेखक ५ मंजूर पदांपैकी केवळ १ पद भरले आहे तर उर्वरित स्वच्छता निरिक्षक १ मंजूर पद, तारतंत्री वायरमन १ मंजूर पद, गाळणीचालक व प्रयोगशाळा

सहायक २ मंजूर पदे, पंप ऑपरेटर विजतंत्री जोडारी १ मंजूर पद अशा एकूण १० मंजूर पदांपैकी ९ पदे रिक्त आहेत. मात्र, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची शिपाई, मुकादम आणि व्हाल्वमन ही तीन मंजूर पदे ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या समावेशनामुळे भरली गेली आहेत.

पोलादपूर नगरपंचायतीमध्ये राज्यस्तरिय संवर्गातील १९ मंजूर पदांपैकी केवळ ७ पदे भरली गेली असून ५० टक्केपेक्षा कमी कर्मचारीवर्ग असताना नगरपंचायतीच्या विकासाचं गाडं चालविण्याची जबाबदारी पोलादपूरचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनी गेल्या वर्षभरात हजर होत समर्थपणे पेलली आहे. मात्र, यामुळे नगरपंचायतीचे दैनंदिन कामकाजच व्यवस्थित सुरू ठेवण्याचा निकाराने प्रयत्न करता येत असल्याची भावना दिसून येत आहे. पोलादपूर नगरपंचायतीमध्ये नगरअभियंता हे पद रिक्त असल्याने महाड नगरपरिषदेचे अभियंता सुहास कांबळे हे कामकाज पाहात असून त्यांच्याकडे त्याव्यतिरिक्त ३ नगरपंचायतींची जबाबदारी असल्याने पोलादपूर नगरपंचायतीच्या बांधकाम परवानगी देणे व इतर बांधकामविषयक कामकाजाला खीळ बसली आहे. लिपिक टंकलेखक मंजूर ५ पदांपैकी ४ पदे रिक्त असल्याने बांधकाम विभाग, करविभाग, लेखाविभाग, आरोग्यविभाग आणि नळपाणीपुरवठा विभाग या विभागांची जबाबदारी एकाच लिपिकावर येत असून संबंधित विभागांच्या कामकाजातील समस्या वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलादपूर नगरपंचायतीमध्ये आकृतीबंधानुसार १९ कर्मचारी असण्याची गरज स्पष्ट झाली आहे. यापैकी तीन कर्मचारी लिपिक रूपेश जाधव, शिपाई प्रमोद शिंदे आणि व्हॉल्वमन यशवंत मोरे यांचे पोलादपूर नगरपंचायतीमध्ये समावेशन करण्यात आले असून पोलादपूर ग्रामपंचायतीचे जुने अनुभवी कर्मचारी लिपिक गणपत मोरे, पाणीपुरवठा कर्मचारी चंद्रकांत जगताप, बाळा पार्टे, रमेश जगताप, वाहन चालक दिलीप पार्टे, सफाई कामगार निलेश मोरे, जयश्री मोरे, शालीनी सोनवणे आणि निकिता निकम या ९ कर्मचाऱ्यांची अवस्था समावेशनाअभावी ग्रामपंचायतीचेही नाही आणि नगरपंचायतीचेही नाही अशा त्रिशंकू स्वरूपाची झाली आहे. पोलादपूर नगरपंचायतीसमोर आगामी काळात पंचवार्षिक निवडणुकांचे काम सुरू होणार असून लोकसंख्येनिहाय प्रभाग रचना, प्रभागनिहाय आरक्षण, प्रत्यक्ष मतदार याद्यांचे प्रारूप व सुधारणा तसेच अन्य कामी कर्मचारीसंख्या अपुरी पडणार आहे. अनुभवी कर्मचारी यशवंत मोरे यांना एकेकाळी मुख्याधिकारी यांच्या अनुपस्थितीत चेकवर स्वाक्षरी करण्यापर्यंतचे अधिकार देण्यात येऊनही प्रत्यक्षात त्यांना निर्धारित शैक्षणिक पात्रतेअभावी समावेशनापासून वंचित ठेवण्यात आले आहे. पोलादपूर नगरपंचायतीचा स्वनिधी वाढण्यासाठी मालमत्तेच्या स्वरूपानुसार करआकारणीत वाढ होऊन २ रूपये ४० पैशांमध्ये वाढ होण्याची गरज आहे. मात्र, याकामी मालमत्तांचे मूल्यमापन करण्यासाठी नगरअभियंत्याचे रिक्त पद तातडीने भरण्याची गरज आहे. पोलादपूर नगरपंचायतीची नगररचना, अग्निशमन यंत्रणा, कचरा व्यवस्थापन, फिल्टरेशन प्लांट, बांधकाम आणि अंतर्गत रस्ते तसेच अन्य महत्वाच्या भविष्यातील विकासाच्या कामांचे नियोजन करण्यासाठी संपूर्ण कर्मचारी क्षमता असण्याची गरज स्पष्ट दिसून येत असून वेळप्रसंगी इमारतींच्या वैध व अवैधतेची नोंद करण्यासाठी खासगी एजन्सीजची नियुक्तीही करण्याची आवश्यकता भासणार आहे. मात्र, हे सर्व परस्पर संबंधित विषय एकमेकांमध्ये गुंतलेले दिसून येत असून तूर्तास तरी कर्मचाऱ्यांची भरती केल्याखेरिज पोलादपूरकरांना नागरी सुविधांमधील उणिवांतून सुटका होणे अशक्य आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून रात्रशाळा सुरू

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत तालुक्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेत खंड पडू नये यासाठी रात्रशाळेच्या धर्तीवर उपक्रम लोभेवाडी मध्ये सुरू झाला आहे.उच्च शिक्षित आदिवासी तरुणाच्या या उपक्रमाचे कौतुक कर्जत तालुका शिक्षण विभागाने केले आहे.

सध्या सर्वत्र ऑनलाईन शिक्षण दिले जात असून जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक देखील ऑनलाइन पध्दतीने सुरू झाले आहे. असे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घेण्यासाठी अनेक प्रकारे अडचणी येत आहेत. स्मार्ट फोन आपल्या पालकांकडे नसल्याने आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहात असल्याचे जाणवत आहे. मात्र आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाल्याने त्यांचे शिक्षण अर्धवट थांबू आणि खंड पडू नये यासाठी लोभेवाडी गावातील उच्च शिक्षित तरुण मोतिराम भिका पादिर हे विद्यार्थ्यांच्या मदतीला आले आहेत. कर्जत तालुका आदिवासी संघटना सचिव असलेले पादिर हे कर्जत येथे श्रीराम फायनान्समध्ये दिवसभर काम करतात. त्यानंतर घरी येऊन सांयकाळी दररोज आपल्या लोभेवाडी गावातील घरात विद्यार्थ्यांचा अभ्यास घेतात.त्यावेळी सोशल डिस्टन्स ठेवून तोंडाला मास्क किंवा रूमाल बांधून ठराविक अंतरावर त्यांना बसवून आपल्या घरात अभ्यास करवून घेत आहेत.

मोतीराम पादिर यांच्या या कार्याची माहिती मिळताच कर्जत शिक्षण विभागाच्या पाथरज केंद्राचे केंद्रप्रमुख बाळासाहेब पालवे, तसेच राष्ट्रीय सेवा संघ जन कल्याण समितीचे आनंद राऊळ, लोभेवाडी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक त्र्यंबक चवरे, उपशिक्षक दहिफळे यांनी लोभेवाडी मध्ये येऊन रात्री घेतल्या जाणाऱ्या शिकवणी वर्गाचे कौतुक केले. ग्रामीण वाडी वस्तीवरील सुशिक्षित तरुणांनी विदयार्थांच्या पालकांची अनुमती घेऊन अशाच प्रकारे शिकवणी वर्ग घेतल्यास विद्यार्थ्यांसाठी नक्कीच उपयुक्त ठरतील असे केंद्रप्रमुख बाळासाहेब पालवे यांनी सांगितले.

या प्रसंगी पोलिस पाटील मारूती लोभी, संजय पादिर, कृष्णा लोभी इत्यादी ग्रामस्थ देखील आपल्या मुलांचा अभ्यास कसा सुरू आहे हे पाहण्यासाठी उपस्थित होते.

ऐनाचीवाडी मधील तरुणाचा देखील प्रयत्न

तालुक्यातील ओलमण ग्रामपंचायत मधील ऐनाचीवाडी हा आदिवासी परिसर असल्याने सध्या दिले जात असलेले ऑनलाईन शिक्षण घेता येत नव्हते. त्यामुळे वाडीमधील उच्च शिक्षित तरूण नयन विठ्ठल वाघ हे दररोज संध्याकाळी आपल्या गावातील शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या घरात बसून अभ्यास घेत आहेत. हा तरुण एमए पर्यंत शिकला असून नोकरी नसल्याने दिवसा शेतात कष्ट करतो आणि रात्री विद्यार्थ्यांना शिक्षित करण्याचा प्रयत्न करतो.

मुरूड -तेलवडे राज्य मार्गाची दुर्दशा

दै.रायगड नगरी । गणेश चोडणेकर

आगरदांडा : मुरूड -भालगाव रोहा राज्य मार्गावरील तेलवडे मार्गाची दुर्दशा उडाली असून हा मार्ग ठिकठिकाणी उखडला आहे. या मार्गावरून रोहा, मुरूड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, महाड माणगाव कडे वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत हा मार्ग येतो.दिघी-आगरदांडा बंदर प्रकल्पाकडे जाणारा हा मार्ग आहे.

या मार्गावर काही ठिकाणी साईड पट्ट्या खाली गेल्याने अपघाताची मोठी शक्यता आहे. सा. बा. विभागाने केले. या रस्त्यावरील खड्डे देखील भरले नसल्याने प्रवाशी व वाहनचालकांना प्रचंड त्रास होत आहे, आजारी माणसांची परिस्थिती खुपच वाईट होत आहे. या रस्त्याकडे कोणीही लक्ष देत नाही मुरूड शहराकडे जाण्यासाठी याच मार्गाचा वापर पर्यटक मोठ्या प्रमाणावर करीत असतात. हा मार्ग कार्पेट डांबरी होणे गरजेचे होते; तरी बांधकाम खात्याच्या अधिका-यांनी तेलवडे मार्गावर लक्ष केंद्रित करून लवकरात लवकर या रस्तावर कार्पेट डांबर टाकुन नागरिकांना सुखाचा प्रवास द्यावा आशी मागणी सर्वच स्थलावर होत आहे.

किल्ले बनविण्यासाठी मुलांची लगबग

दै.रायगड नगरी । आगरदांडा

दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपल्याने मुरूड शहरातील व पंचक्रोशी परिसरातील लहान मुलांची किल्ले तयार करण्यासाठी लगबगीने सुरू झाली आहे.

श्लोक सुरेश वाघमारे मुरूड पोलिस लाईन येथील मुले किल्ले करण्यासाठी विविध किल्लाच्या प्रतिकृती बनवत आहेत. किल्लावर ठेवण्यासाठी मृतीची खरेदी करण्यात येत आहे. आपला किल्ला इतरांपेक्षा वेगळा व्हावा या हेतुने मुले परिश्रम घेत आहेत. किल्लांची प्रतिकृती तयार करताना मावळे, तोफ, किल्ल्याचे प्रवेशव्दार, शेतकरी, महिला-पुरूष, व्दारपाल, मावळे लढणारे मावळे विविध भर दिला जात आहे.दुकानांतही अशा प्रतिकृतीची मागणी आहे.

या वर्षी मुलांकडून विविध प्रकारची खेळणी, तोफ, छत्रपती शिवाजी महाराज, मावळे आधिच्या प्रतिकृतीची मागणी होत आहे. यामध्ये माती व प्लास्टिकच्या अशा दोन प्रकारच्या प्रतिकृती आहेत प्लास्टीक पेक्षा मातिची प्रतिकृती महाग आहे. तरीही मुला-मुलीकडून मातीच्या प्रतिकृतीची मागणी जास्त आहे. त्यामुळे कमीत कमी किमतीत माती खेळणी व प्रतिकृती उपलब्ध करून देण्यात आल्याने विक्रेते- रूपेश राजपुरकर यांनी सांगितले.

पनवेल महानगरपालिका
जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पत्ता	झाडांचा प्रकार व संख्या	झाडे तोडण्याचे कारण
१	श्री.संजय कटेकर, शहर अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका	५ जंगली	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वार्ड क्र.१८ मधील अं.भु.क्र.३१५ ते सम्राट हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४ पर्यंत रस्ता काँक्रीट करणेकामी ५ जंगली झाडे मध्ये येत असून तोडणेबाबत.

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
(समीर म.जाधव)
वृक्ष अधिकारी तथा
सहा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/वृ.पा./१६६/२०२०
दिनांक : ०६/११/२०२०